**कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव, ता. जि. लातूर**

. मराठी विभाग

. (शैक्षणिक वर्ष २०२५-२६)

महाविद्यालयामध्ये मराठी विभागाच्या अंतर्गत विविध सृजनशील उपक्रम विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आले.त्यात कथालेखन,काव्यलेखन,पुस्तक प्रदर्शन, व्याख्याने या सारखे विविध उपक्रम वर्षभर राबवण्यात आले. त्याचा अहवाल पुढील प्रमाणे-

महाविद्‌यालयामध्ये दिनांक ८ ते १३ ऑगस्ट दरम्यान कथालेखन स्पर्धा घेण्यात आली त्यात एकूण १० विद्‌यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.त्यात खालील तीन विद्‌यार्थ्यांनी गुणानुक्रमे प्रथम-ऋषिकेश सुरवसे द्‌वितीय-साखरे गणेश, तृतीय-कांबळे यश व जवादे नेहा या विद्‌यार्थ्यांचा सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला.







५ जानेवारी २०२६ रोजी महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन साजरा करून मराठी विभागाच्या वतीने ग्रंथ प्रदर्शन भरविण्यात आले. या ग्रंथ प्रदर्शन कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. शीतल खोत या लाभल्या होत्या तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुष्यत कटारे सर उपस्थित होते.यावेळी प्रा.डॉ.पवार जयदेवी प्रा. विवेक गोस्वामी व महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थी यांनी विविध ग्रंथाचे वाचन केले.



दिनांक ६ जानेवारी २०२६ रोजी महाविद्यालयामध्ये मराठी विभागाच्या वतीने पुस्तक प्रदर्शन भरवून विदयार्थ्यांना पुस्तकाविषयीचे महत्व सांगून त्यांना वाचणासाठी प्रवृत्त करण्यात आले.सोबत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुष्यत कटारे व इतर प्राध्यापक व विध्यार्थी सोबत आहेत.





## मराठी विभाग

**२७ फेब्रुवारी २०२६ रोजी कवी कुसुमाग्रजांचा जन्मदिन मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा करण्यात आला, त्या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. चंद्रकांत शेरखाने सर उपस्थित होते, यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दुष्यत कटारे सर अध्यक्ष म्हणून उपस्थित होते, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रा.महारुद्र बिडवे सर माजी विद्यार्थी हणमंत शिंदे यांनी मराठी भाषा दिनाच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिंदे प्रांजली हिने केले आभार प्रदर्शन कृष्णा धामणगावे यांनी केले. यावेळी प्रा. डॉ. पवार जयदेवी प्रा. विवेक गोस्वामी व या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक व विध्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.**






पुरोगामी विचाराचे

**एकमत**

page- 7
02 Mar 2026

### मराठी भाषा संस्कृतीची : प्रा. शेरखाने

**बाभळगाव : वार्ताहर**

कुसुमाग्रजांनी मराठी भाषेकडे केवळ अभिव्यक्तीचे साधन म्हणून पाहिले नाही तर तिला स्वाभिमान, आत्मसन्मान आणि सांस्कृतिक ओळख दिली. मराठी भाषा कमी लेखली जाऊ नये, यासाठी त्यांनी आयुष्यभर ठाम भूमिका घेतली. मराठी ही केवळ संवादाची भाषा नसून ती आपली संस्कृती, परंपरा आणि अस्मिता जपणारी भाषा आहे. नवीन पिढीने मराठी भाषेचा अभिमान बाळगून तिचा दैनंदिन जीवनात अधिकाधिक वापर केला पाहिजे, असे प्रतिपादन शिवाजी महाविद्यालय, रेणापूर येथील प्रा. डॉ. चंद्रकांत शेरखाने यांनी केले.

दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाळगाव येथे मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे भूषवले होते. अध्यक्ष समारोप करताना ते म्हणाले की, मराठी ही ज्ञान, व्यवहार आणि व्यक्तिमत्त्व घडवणारी भाषा आहे. पाहुण्यांनी मांडलेले विचार विद्यार्थ्यांसाठी दिशादर्शक आहेत. महाविद्यालयामधूनच मराठी भाषेप्रती प्रेम, आदर आणि अभिमान निर्माण होणे आवश्यक असून त्यासाठी असे उपक्रम सातत्याने मराठी विभागाच्या वतीने राबवले जातात. मराठी विभाग प्रमुख डॉ. जयदेवी पवार यांनी शुभेच्छा देताना सांगितले की, ‘शुद्ध आणि प्रभावी मराठी भाषेचा वापर केल्यास विद्यार्थ्यांच्या विचारक्षमतेला चालना मिळते. मराठी वाचन, लेखन आणि वक्तृत्व यामधून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो.